# [ 9 ]

## ः आरती शेजारती ः

ओवाळूं आरती माझ्या सद्‌गुरूनाथा . माझ्या सद्‌गुरूनाथा |
पांचांही तत्वांचा. पांचांही तत्वांचा दीप लाविला आता |

निर्गुणाची स्थिती कैसी आकारा आली कैसी आकारा आली |
सर्वा घटीं भरूनि सर्वा घटीं भरूनि उरली गुरू माउली ‖ ओवाळू ‖

रज तम सत्त्व तिघे माया प्रसवली तिघे माया प्रसवली |
मायेचिये पोटीं मायेचिये पोटीं कैसी माया उध्दवली ‖ ओवाळू ‖

सप्तसागरी कैसा खेळ मांडीला. कैसा खेळ मांडीला |
खेळूनियां खेळ. खेळूनियां खेळ अवघा विस्तार केला ‖ ओवाळू ‖

ब्रम्हांडीची रचना कैसी दाखविली डोळां कैसी दाखविली डोळां |
तुका म्हणे माझा. तुका म्हणे माझा स्वामी कृपाळू भोळा ‖ ओवाळू ‖